राम जिनका नाम है,
अयोध्या जिनका धाम है,
ऐसे रघुनंदन को मेरा प्रणाम है।
राम नवमीच्या
सर्वांना हार्दिक शुभेच्छा....!
-संपादक

www. sahyandrinews.com

दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार

संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे



• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १९५ • Title - Code :- MAHMAR49513 • बुधवार दि.१७ एप्रिल २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# काहींना संधी मिळाली पण त्यांना सोने करता आले नाही-अजित पवार

बारामती (वृत्तसंस्था)-काहींना संधी मिळाली मात्र त्या संधीचे त्यांना सोने करता आला नाही, असे म्हणत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सुप्रिया सुळे यांच्यावर टीका केली आहे. त्या काळामध्ये ते मंत्री होऊ शकले असते. मात्र, ते मंत्री होऊ शकले नाहीत. मंत्री झाल्यानंतर आपण लोकांचे प्रश्न सोडवू शकतो. प्रशासनावर पकड निर्माण करू शकतो. मात्र, त्यांना संधीचे सोने करता आले नसल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे. अजित पवार यांच्या या टीकेला खासदार सुप्रिया सुळे यांनी देखील प्रत्युत्तर दिले आहे. या देशात अनेक मंत्री होऊन गेले आहेत. मात्र मंत्री नसतानाही चांगले काम केलेल्या नेत्यांची नावे आजही अभिमानाने घेतले जाते. ते कधी मंत्री नव्हते, असे म्हणत सुप्रिया सुळे यांनी अजित पवार यांना प्रत्युत्तर दिले आहे.बारामती लोकसभा मतदारसंघांमध्ये पवार विरुद्ध पवार अशी लढत होत आहे. या लढतीमध्ये खासदार सुप्रिया सुळे विरुद्ध सुनेत्रा पवार असा सामना रंगला आहे. यात उपमुख्यमंत्री अजित पवार हे बारामती लोकसभा मतदारसंघांमध्ये सुनेत्रा पवार यांचा प्रचार करताना दिसत आहेत. या वेळी त्यांनी खासदार सुप्रिया सुळे यांच्यावर हल्ला चढवला. राज्यामध्ये काहींना संधी होती. मात्र, त्या संधीचे त्यांना सोने करता आले नसल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे. त्यांना मंत्री होता आले असते. मंत्री होऊन नागरिकांचे प्रश्न सोडवता आले असते. मात्र, त्यांनी ते केले नसल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे.



मधु दंडवते यांच्यासारखी अनेक उदाहरणे आपल्यासमोर आहेत. ज्यांनी कधी मंत्रीपदे भूषवले नाही. मात्र, राजकारणात त्यांची नावे आजही आदराने घेतले जातात. त्यामुळे अजित पवार कोणाविषयी बोलले मला माहित नाही. मात्र , अनेक मंत्री न झालेले नेते देखील राजकारणात मोठे झाले असल्याचे सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे.चाळीस वर्षे झाले तरी बाहेरची म्हणत आहात, असा खोचक टोला अजित पवार यांनी शरद पवार यांना लगावला आहे. वडीलधारी लोकांना जुना काळ आठवत असेल तर त्यांना म्हणा जुना काळात थोडा बाजूला ठेवा. आता नवीन काळ बघा, आता चार दिवस सासूचे संपले आहेत. आता सुनेचे चार दिवस येऊ द्या. नाहीतर सुनेने नुसते सासू सासू सासू करत बसायचे का? असा प्रश्न देखील अजित पवार यांनी उपस्थित केला. बाहेरची, बाहेरची, बाहेरची, म्हणत बसतात. असे कुठे असते का राव? असा सवाल देखील अजित पवार यांनी शरद पवार यांना विचारला आहे.

## ज्यांना अटक होण्यापासून वाचवले तेच आज विरोधात-नितीन गडकरी

**नागपूर (वृत्तसंस्था)**

अनेक काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते माझ्याकडे त्यांच्या कामासाठी आले आहेत परंतु ते आज माझ्या विरोधात प्रचार करत आहे. एक तर जे तुरुंगात जाण्याच्या स्थितीत होते आणि त्यांना अटक होण्यापासून मी वाचवले होते. ते सुद्धा आज विरोधात प्रचार करत आहे. मात्र, याबद्दल माझा कुठलाही आक्षेप नसल्याचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले.

नागपूर लोकसभा मतदार संघाचे उमेदवार नितीन गडकरी यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत वचननामा ते वचनपूर्ती हा जाहीरनामा जाहीर केला, त्यावेळी ते बोलत होते. गेल्या दहा वर्षात नागपूर शहरात केलेली विकास कामे



आणि पुढील पाच वर्षात शहराच्या विकासासाठी कुठली विकास कामे केली जाणार आहे याचा आलेख मांडताना गडकरी म्हणाले, गेल्या पंधरा वीस दिवसांपासून शहरातील विविध भागात प्रचार सुरू असताना लोकांचा प्रतिसाद मिळतो. मात्र, माझ्यासोबत काम करणारे किंवा ज्यांना मी अनेक कामात मदत केली आहे असे अनेक काँग्रेसचे कायकर्ते व नेते माझ्या विरोधात प्रचार करत आहे.शहरात दोन तीन दिवसापूर्वी एक पदाधिकारी विरोधात फिरत होते, जे तुरुंगात जाण्याच्या स्थितीत होते. त्यांना अटक होण्यापासून मी वाचवले आहे. मात्र, ते आज विरोधात प्रचार करत आहे. त्याला माझा काही आक्षेप नसून मी विरोधात असलेल्यांची काम केली आहे. मी कधीही जातीभेद किंवा पक्ष क्षेद केला नाही. जो माझ्याकडे आला आहे त्याचे काम केले, असेही गडकरी म्हणाले.

## कुठे ऊन तर कुठे पाऊस:मराठवाडा, विदर्भात अवकाळी पावसाची शक्यता

**पुणे**-ऐन उन्हाळ्यात राज्यात अवकाळीचा तडाखा पाहायला मिळत आहे. आता आणखी चार दिवस विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांत अवकाळी पावसाचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. त्यातच दुसरीकडे कोकण, ठाणे, मुंबईत उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे राज्यात कुठे ऊन तर कुठे पाऊस अशी स्थिती पाहायला मिळणार आहे.

राज्यातील कमाल आणि किमान तापमानात देखील मोठी वाढ झाली आहे. ठाणे जिल्ह्यात सोमवारी विक्रमी तापमान नोंदवले गेले आहे. तर मंगळवारी उत्तर कोकणातील ठाणे, मुंबई, रायगड जिल्ह्यात उष्ण लाटेचा इशारा देण्यात



आला आहे. नागरिकांनी दुपारच्या वेळी घराबाहेर न पडण्याचा सल्ला हवामान खात्याने दिला आहे.दरम्यान, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये आजही पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. उत्तर गुजरात आणि परिसरावर चक्राकार वाऱ्यांची स्थिती अद्याप कायम असल्याने वातावरणात सातत्याने बदल होत आहेत. उत्तर ओडिशापर्यंत हवेचा कमी दाबाचा पट्टा तयार झाला आहे.मंगळवारी मराठवाड्यातील धाराशिव, बीड, लातूर, परभणी, हिंगोली आणि नांदेडमध्ये पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तेसच मध्य महाराष्ट्रातील नगर, पुणे,सांगली, सोलापूरमध्ये हलक्या पावसाचा अंदाज आहे. तर उद्या बुधवारी सांगली, सोलापूर, धाराशिव आणि लातूर जिल्ह्यात काही ठिकाणी विजा आणि मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज हवामान विभागाने दिला.

## शिंदे गट विदर्भातील सर्व जागा जिंकणार-उदय सामंत

**नागपूर (वृत्तसंस्था)**

शिवसेनेच्या शिंदे गटाचे कोकणातील नेते व मंत्री उदय सामंत यांनी पक्षाच्या वाट्याला आलेल्या विदर्भातील रामटेक, यवतमाळ-वाशीम आणि बुलढाणा लोकसभा मतदारसंघावर लक्ष केंद्रीत केले आहे. प्रचाराच्या निमित्ताने ते वेळोवेळी नागपूरसह विदर्भाच्या विविध भागात जातात. त्यांनी शिंदे गट विदर्भातील लोकसभेच्या तीनही जागा जिंकेल असा विश्वास व्यक्त केला आहे.

मंगळवारी ते नागपूरला आले असता त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, विदर्भात शिंदे गट लोकसभेच्या तीनही जागा मोठ्या मताधिक्याने जिंकेल. भावना गवळी नाराज नाही, त्यां पक्षाच्या प्रचारात सहभागी झाल्या आहेत. सामंत म्हणाले , महायुतीत नाराजी नाही. महायुतीचे सर्व कार्यकर्ते पदाधिकारी सक्षम हैं. पक्ष फोडणे, ब्लैकमेल करणे हे आमचे काम नव्हे. उपमुखयमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात भाजपाचे कार्यकर्ते महायुतीच्या उमेदवाराचे काम करीत आहे, मुख्यमंत्री शिंदे के नेतृत्व में शिवसेना पूर्ण क्षमतेने प्रचारात उतरली आहे. त्यामुळे आमचा विजय निश्चित आहे.

पूर्व विदर्भात रामटेकमध्ये पहिल्या टप्प्यात १९ एप्रिलला मतदान आहे. दुसऱ्या टप्प्यात



होणाऱ्या निवडणुकीत यवतमाळ-वाशीम आणि बुलढाणा या शिंदे गटाचे उमेदवार असलेल्या मतदारसंघात निवडणूक आहे. पहिल्या टप्प्यातील प्रचार उद्या संपणार आहे. रामटेकमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सभा घेतली. मंगळवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दोन सभा आहेत. शिंदे गटाने अभिनेता गोविंदालाही या मतदारसंघात आणले होते. येथे शिंदे गटाचे राजू पारवे व काँग्रेसचे शामकुमार बर्वे यांच्यात थेट लढत आहेत. रश्मी बर्वे यांचे जात प्रमाणपत्र रद्द झाल्याने त्यांची उमेदवारी बाद झाली. मात्र या निर्णयाला उच्च न्यायालयाने स्थगिती दिली. मात्र निवडणूक प्रक्रिया पुढे गेल्याने त्यांना निवडणूक लढता आली नाही. सरकारच्या दबावात बर्वे यांचे प्रमाणपत्र रद्द करण्यात आले, असा आरोप काँग्रेसकडून केला जात आहे.

## महापारेषणची टॉवर लाइनची वीजवाहिनी तुटली

**पुणे**-महापारेषण कंपनीच्या २२० केव्ही टॉवर लाइनची दोनपैकी एक वीजवाहिनी तुटल्याने पिरंगुट २२० केव्ही व हिंजवडी २२० केव्ही उपकेंद्रांचा व पर्यायाने महावितरणच्या २० वाहिन्यांचा वीजपुरवठा मंगळवारी सकाळी बंद पडला. परिणामी भुकूम, भूगाव, पिरंगुट, कोळवण खोरे, मुठा खोरे आदी मुळशी तालुक्यातील परिसरातील ४५ गावांतील सुमारे ६५ हजार वीजग्राहकांचा वीजपुरवठा बंद आहे. दुपारी ४ वाजेपर्यंत दुरुस्ती काम पूर्ण होईल. त्यानंतर वीजपुरवठा पूर्ववत होणार असल्याची माहिती महापारेषणकडून देण्यात आली.

याबाबत माहिती अशी की, कोकणातील रोहा येथून महापारेषणच्या कांदळगाव २२० केव्ही अतिउच्चदाब उपकेंद्रातून टॉवर लाइनद्वारे पिंरगुट व हिंजवडी येथील महापारेषणच्या २२० केव्ही अतिउच्चदाब उपकेंद्राला वीजपुरवठा करण्यात येतो. मात्र कांदळगाव २२० केव्ही टॉवर लाइनची एक वीजवाहिनी आंबेगाव (ता. मुळशी) येथे मंगळवारी (दि. १६) सकाळी सव्वा ९ वाजताच्या सुमारास तुटली. त्यामुळे पिरंगुट व हिंजवडी अतिउच्चदाब उपकेंद्रांचा वीजपुरवठा बंद पडला. तर या उपकेंद्रांवर अवलंबून असलेल्या महावितरणच्या सुमारे २० वीज वाहिन्यांचा वीजपुरवठा देखील खंडित झाला. त्यामुळे मुळशी तालुक्यातील भूगाव, भूकूम पिरंगूट, बुरावडे, कोळवण खोरे, मुठा खोरे, पौड, माले, माण, मारूंजी, कासारसाई, नेरे, दत्तवाडी, हिंजवडीचा काही भागासह ४५ गावांतील सुमारे ६५ हजार वीजग्राहकांचा वीजपुरवठा खंडित झाला आहे.महापारेषणची अतिउच्चदाब वीजवाहिनी तुटल्याने ७० मेगावॅट विजेची पारेषण तूट निर्माण झाली आहे. मात्र तापलेल्या उन्हामुळे विजेची मागणी वाढत आहे. त्यात ७० मेगावॅट विजेचे भारव्यवस्थापन करून पर्यायी वीजपुरवठा उपलब्ध करून देणे तांत्रिकदृष्ट्या अशक्य आहे. त्यामुळे महापारेषणकडून तुटलेल्या अतिउच्चदाब वीजवाहिनीच्या दुरूस्ती कामाला वेग देण्यात आला आहे. दुपारी ४ वाजेपर्यंत तुटलेल्या वीजवाहिनीचे दुरुस्ती काम पूर्ण होईल व साधारणतः ५ वाजेपर्यंत टप्प्याटप्प्याने मुळशी तालुक्यातील ४५ गावांचा वीजपुरवठा पूर्ववत करण्यात येईल.

## शिक्षण, नोकरीसाठी बाहेरगावी गेलेल्या मतदारांना आणण्यासाठी खास बसेसची व्यवस्था

**नागपूर (वृत्तसंस्था)**

पाहाता पाहाता अत्यंत चुरशीची झालेल्या नागपूर लोकसभा मतदार संघातील निवडणुकीत एकेक मत महत्वाचे ठरणार आहे. भाजपने युवा व नवमतदारांवर अधिक लक्ष केंद्रीत केले आहे. महायुतीची यंत्रणा या कामी लागली आहे. पुण्यात नोकरी किंवा शिक्षणासाठी गेलेल्या पन्नास हजारांहून अधिक मतदारांना मतदानासाठी नागपूरमध्ये आणण्याचे प्रयत्न सुरु झाले आहेत. यासाठी विदर्भ मित्रमंडळातर्फे निशुल्क बसेसची व्यवस्था करण्यात आली आहे.जिल्हा प्रशासनासह महाविकास आघाडी आणि महायुतीने मतदानाची टक्केवारी वाढावी तसेत जास्तीत जास्त युवा तसेच नवमतदारांनी मतदान करावे यासाठी जनजागृती व प्रचार, प्रसार केला जात आहे. नागपूरमध्ये एकूण २२ लाख मतदार असून त्यात सरासरी दीड लाखांहून अधिक नवमतदार व युवा मतदारांची संख्या आहे. यातील अनेक जण सध्या पुण्यात नोकरी, शिक्षण, रोजगारानिमित्त वा अन्य कारणाने राहायला किंवा शिक्षणासाठी, व्यवसायासाठी किंवा काही कामासाठी आले आहेत. सध्या नागपूरला जाण्यासाठी रेल्वे आणि बसेसची आरक्षणे फुल्ल झाली आहेत. त्यामुळे केवळ मतदानासाठी नागपूरला येणे अनेकांना अवघड आहे. ही बाब लक्षात घेऊनच त्यांना नागपूरला (१९ एप्रिल) मतदानाला जाण्यासाठी विदर्भ मित्रमंडळातर्फे निशुल्क बसेसची व्यवस्था करण्यात आली आहे.

## उदयनराजे भोसले यांना साताऱ्याची उमेदवारी जाहीर

**सातारा (वृत्तसंस्था)**

राज्यात सर्वाधिक चर्चेत असलेल्या सातारा लोकसभा मतदारसंघातून अखेर छत्रपती उदयनराजे भोसले यांना भारतीय जनता पक्षाच्या वतीने उमेदवारी जाहीर झाली आहे. भारतीय जनता पक्षाने आज काही उमेदवारांच्या नावांची घोषणा केली. यामध्ये महाराष्ट्रातील एका नावाचा समावेश आहे. यामध्ये छत्रपती उदयनराजे भोसले यांना सातारा लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे. वास्तविक उमेदवारी जाहीर होण्याआधीच उदयनराजे भोसले यांनी आपल्या प्रचाराला सुरुवात केली होती. सातारा लोकसभा मतदारसंघातून आपणच महायुतीचे उमेदवार असेल, असा दावा देखील त्यांनी केला होता. त्यामुळे अपेक्षेप्रमाणे त्यांच्या नावाची आज घोषणा करण्यात आली.

सातारा लोकसभा मतदारसंघांमध्ये आता उदयनराजे भोसले यांची थेट लढत महाविकास आघाडीचे उमेदवार शशिकांत शिंदे यांच्यासोबत होणार आहे. शशिकांत शिंदे हे शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या तुतारी या चिन्हावर निवडणूक लढवत आहेत. या मतदारसंघातील विद्यमान खासदार देखील शरद पवार गटाचे असून त्यांनी यावेळी आरोग्याचे कारण देत निवडणुकीत उभे राहणार नसल्याचे स्पष्ट केले होते. त्यामुळे शरद पवार गटाच्या वतीने शशिकांत शिंदे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

सातारा लोकसभा मतदारसंघातून भारतीय जनता पक्षाकडून आपण लढवण्यास इच्छुक असल्याचे खासदार उदयनराजे



भोसले यांनी आधीच जाहीर केले होते. त्यासाठी त्यांनी दिल्लीत चार दिवस तळ देखील ठोकला होता. दिल्लीतून परतल्यानंतर आपल्यालाच उमेदवारी मिळाली असल्याचा दावा देखील त्यांनी केला आहे. मात्र, भारतीय जनता पक्षाच्या वतीने अद्याप त्यांच्या नावाची अधिकृत घोषणा करण्यात आलेली नव्हती. वास्तविक महायुतीमध्ये सातारा लोकसभा मतदारसंघ अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे होता. मात्र, असे असताना उदयनराजे भोसले यांच्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ही जागा सोडण्यास तयार असल्याचे बोलले जात होते. मात्र, त्या बदल्यात नाशिक लोकसभा मतदारसंघ हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला देण्याची तयारी भाजपने दाखवली आहे. मात्र नाशिक लोकसभा मतदारसंघात विद्यमान खासदार हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे आहे. त्यामुळे या जागे संदर्भात पेच निर्माण झाला होता. मात्र, आता उदयनराजे भोसले यांच्या नावाची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे.

# अयध्येतील रामराज्याचे जनकः प्रभू श्रीरामचंद्र!


**भगवान विष्णूंचा सातवा अवतार असणाऱ्या प्रभू श्रीराम यांचा जन्म चैत्र शुद्ध नवमी रोजी दुपारी १२ वाजता झाला. श्री राम नवमीचा सण दरवर्षी मोठ्या आनंदात साजरा केला जातो. या दिवशी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते, राम नवमी हा हिंदू धर्मातील शुभ सणांपैकी एक आहे. हा सण चैत्र नवरात्रीच्या नवव्या दिवशी साजरा केला जातो.**

चैत्र शुद्ध नवमी हा हिंदू पंचागानुसार चैत्र महिन्यातील नवरात्राचा नववा दिवस आहे. या तिथीस भगवान विष्णूचा सातवा अवतार समजले गेलेले प्रभू श्रीराम यांचा जन्म झाला, अशी मान्यता आहे. हा दिवस श्री रामनवमी म्हणून साजरा करतात. श्रीराम नवमीला दुपारी सूर्य डोक्यावर आल्यावर– दुपारी १२:०० वाजता रामजन्माचा सोहळा होतो. श्रीरामाच्या मूर्तीला पाळण्यात घातले जाते. श्री रामांच्या चित्रास वा मूर्तीस इतर हारांसमवेतच गाठीपण घालतात. श्री रामांची पूजा करताना त्याना करंगळीजवळच्या बोटाने, म्हणजेच अनामिकेने गंध लावतात. तसेच श्रीरामांना हळद–कुंकू वहातांना आधी हळद अन् नंतर कुंकू, उजव्या हाताच्या अंगठा आणि अनामिका यांच्या चिमटीत घेऊन चरणांवर वाहतात. श्रीरामांना केवडा, चंपा, चमेली अन् जाई ही फुले वाहतात. त्यानंतर आरती करून प्रसाद वाटतात. रामजन्माच्या दिवशी साजऱ्या केल्या जाणाऱ्या उत्सवांत रामजन्माचा पाळणा अवश्य म्हटला जातो.

श्रीराम जन्मला गं सखे;
श्रीराम जन्मला !!

श्रीराम नवमीच्या दिवशी मठ–मंदिरात भजन, पूजन, कीर्तन, प्रवचन इत्यादी कार्यक्रम करून हा जन्मोत्सव सोहळा साजरा केला जातो. काही ठिकाणी तर गुढीपाडवा ते श्रीराम नवमी या काळांत रामायण ग्रंथाचे वाचन, रामकथेचे निवेदन, गीत रामायणाचे गायन वगैरे कार्यक्रमही केले जातात. श्रीराम हे सर्व आबालवृद्धांची लाडकी देवता असल्यामुळे सर्व लहान थोर मंडळी या उत्सवात सहभागी होतात.

हिंदू धर्मग्रंथानुसार त्रेतायुगातील रावणाचे अत्याचार संपवण्यासाठी आणि धर्माची पुनर्स्थापना करण्यासाठी भगवान विष्णूने मृत्यूच्या जगात–मृत्यूलोकात श्रीराम म्हणून अवतार घेतला. प्रभू श्रीरामचंद्रजींचा जन्म चैत्र शुक्ल नवमीला राणी कौशल्याच्या पोटी पुनर्वसु नक्षत्रात आणि कर्क राशीत राजा दशरथाच्या घरी झाला. रामायणानुसार अयोध्येचा राजा दशरथ याला तीन बायका होत्या, परंतु फार काळ राजा दशरथला संततीचे सुख कोणीही देऊ शकल्या नाही, त्यामुळे राजा दशरथ खूप अस्वस्थ असायचे. पुत्रप्राप्तीसाठी राजा दशरथ यांना वशिष्ठ ऋषींनी पुत्रकामेष्टी यज्ञ करण्याची कल्पना दिली होती. यानंतर राजा दशरथाने आपल्या जमाई महर्षी ऋषिश्रृंगासोबत यज्ञ केला. त्यानंतर यज्ञकुंडातून एक



संकलन व सुलेखन
श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.
पोटेगावरोड, गडचिरोली,
फक्त मधुभाष– ७१३२७९६६८३.

दैवी पुरुष हातात खीरीची वाटी घेऊन बाहेर आला. यज्ञ संपल्यानंतर महर्षी ऋषीशृंगाने दशरथाच्या तीन पत्नींना खीरीची वाटी खायला दिली. खीर खाल्ल्यानंतर काही महिन्यांनी तिन्ही राण्या गरोदर राहिल्या. बरोबर ९ महिन्यांनंतर राजा दशरथाची ज्येष्ठ राणी कौशल्याने श्रीराम– भगवान विष्णूचा सातवा अवतार, कैकेयी यांनी भरत आणि सुमित्रा यांनी लक्ष्मण आणि शत्रुघ्न यांना जन्म दिला. भगवान श्रीरामाचा जन्म दुष्ट प्राण्यांचा नाश करण्यासाठी पृथ्वीवर झाला होता.

संतशिरोमणी कबीर साहेबजी आदिरामाची व्याख्या स्पष्ट करतात, की आदिराम हा अविनाशी देव आहे जो सर्वांचा निर्माता आणि पालनकर्ता आहे. ज्याच्या एका इशाऱ्यावर पृथ्वी आणि आकाश कार्य



करतात, ज्याच्या स्तुतीमध्ये तेहतीस श्रेणी देवी–देवता नतमस्तक होतात. जो पूर्णपणे मोक्षदाता आणि आत्मस्वरूप आहे. भारतभर श्रीरामजन्म हा चैत्र शुक्ल नवमीला झाला असे समजले जात असले तरी, ज्या अयोध्येत रामाचा जन्म झाला, त्या अयध्येतील वैश्य समाज श्रीरामाचा जन्म मार्गशीर्ष महिन्यातील पंचमीला झाला, असे मानतात. त्या पंचमीला अगहन पंचमी म्हणतात. कारण मार्गशीर्षाला हिंदीत अगहन म्हणतात! याला आधार म्हणजे गोस्वामी संत तुळशीदासाच्या रामचरित मानस मधील पुढील उल्लेख–

मंगल मूल लगन दिनु आया।
हिम रिपु अगहन मासु सुहावा।।
ग्रह तिथि नखतु जोगु वर बारू।
लगन सोधि विधि कीन्ह विचारू।।

श्रीराम नवमी संपूर्ण भारतात साजरी केली जाते. तेलंगणातील भद्राचलम मंदिर हे अशा ठिकाणांपैकी एक आहे जिथे श्रीराम नवमी मोठ्या थाटामाटात साजरी केली जाते. चैत्र नवरात्रीचीही समाप्ती श्रीराम नवमीच्या दिवशी होते. हिंदू धर्मग्रंथानुसार भगवान श्रीरामजींचा जन्म या दिवशी झाला होता, म्हणून भक्त ही शुभ तिथी पावन श्रीराम नवमी म्हणून साजरी करतात आणि पावन नद्यांमध्ये पवित्र स्नान करतात.

हिंदू कॅलेंडरनुसार श्रीराम नवमी हा सण चैत्र महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या नवव्या दिवशी साजरा केला जातो. धर्मग्रंथानुसार भगवान श्रीरामांचा जन्म याच दिवशी झाला, म्हणून हा दिवस श्रीराम जन्मोत्सव म्हणून साजरा केला जातो. प्रभू श्रीरामचंद्रजींच्या जन्मोत्सवामुळे या तिथीला श्रीराम नवमी असे म्हणतात. भगवान रामाला विष्णूचा अवतार मानले जाते. भगवान विष्णूंनी पृथ्वीवरील राक्षसांना मारण्यासाठी त्रेतायुगात श्रीराम म्हणून मानव अवतार घेतला. प्रभू श्रीरामाला मर्यादा पुरुषोत्तम म्हटले जाते, कारण त्यांनी आपल्या आयुष्यात अनेक संकटे सोसूनही प्रतिष्ठित जीवनाचे उत्तम उदाहरण मांडले. प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी आपला आदर्श सोडला नाही आणि जीवन सन्मानाने जगले. त्यामुळेच त्यांना सर्वोत्तम पुरुषाचे स्थान देण्यात आले आहे.

या दिवशी विशेषत: श्रीरामाची पूजा करून विविध कार्यक्रमांचे आयोजन करून त्यांचा जन्मोत्सव साजरा केला जातो. भगवान श्रीरामाचा जन्मदिवस संपूर्ण भारतभर उत्साहात साजरा केला जात असला तरी विशेषतः श्रीराम जन्मभूमी असलेल्या अयोध्येत हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. श्रीराम नवमीच्या वेळी अयोध्येत भव्य भक्तमेळा आयोजित केला जातो, ज्यामध्ये दूरदूरच्या भक्तांव्यतिरिक्त, भिक्षू आणि संन्यासी देखील पोहोचतात आणि श्रीराम जन्म साजरा करतात. सामान्यत: श्रीराम नवमीच्या दिवशी हिंदू कुटुंबांमध्ये उपवास, पूजा आणि इतर धार्मिक विधी आयोजित केले जातात. श्रीरामजींच्या जन्माच्या वेळी त्यांच्या जयंतीचे आयोजन करून त्यांचे जल्लोषात स्वागत केले जाते. अनेक घरांमध्ये विशेष सजावट केली जाते, घराला पवित्र करून कलशाची स्थापना केली जाते आणि प्रभू श्रीरामजींची पूजा करून भजन–कीर्तन केले जाते. विशेष म्हणजे या दिवशी श्रीराम, माता जानकी आणि लक्ष्मणजी यांचीही पूजा केली जाते.

माता कैकेयीने श्रीरामाचे वडील राजा दशरथ यांच्याकडून वरदान मागितल्यावर श्रीरामांनी राजवाडा सोडून १४ वर्षांचा वनवास आनंदाने स्वीकारला आणि वनवासात असतानांच अनेक राक्षसांसह अहंकारी रावणाचा वध करून सोन्याची लंका जिंकली. अयोध्या सोडताना माता जानकी आणि भाऊ लक्ष्मण हेही श्रीरामांसोबत १४ वर्षे वनवासात गेले. यामुळेच श्रीराम नवमीला श्रीरामांसोबत त्यांचीही पूजा मोठ्या भक्तिभावाने केली जाते.

।। सर्व भारतीयांना पावन श्रीराम नवमी निमित्त हार्दिक हार्दिक शुभेच्छा ।।

### अतिसंवेदनशील भागातील मतदान पथके रवाना

## गडचिरोलीत ६८ मतदान केंद्रावरील ७२ निवडणूक पथकाच्या २९५ मतदान अधिकाऱ्यांचे एअर-लिफ्ट

**गडचिरोली । प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी १९ एप्रिल रोजी होणाऱ्या मतदानाकरिता १२–गडचिरोली–चिमुर लोकसभा मतदार संघातील संवेदनशील व अतिसंवेदनशील मतदान केंद्रांवर मतदान पथके रवाना करण्यास १७ एप्रिल ला सुरूवात करण्यात आली. गडचिरोलीतील विविध संवेदनशील आणि अतिसंवेदनशील अशा ६८ मतदान केंद्रावरील ७२ निवडणूक पथकाच्या २९५ मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांना ईव्हीएम आणि इतर युनिटसह १६एप्रिल ला सकाळी भारतीय वायुसेना आणि भारतीय लष्कराच्या ३–एम.आय.– १७ आणि ४–ए.एल.एच. हेलिकॉप्टरच्या मदतीने बेसकॅम्पवर सुरक्षितपणे पोहचिविण्यात आले. गडचिरोली–चिमूर मतदारसंघात एकूण सहा विधानसभा क्षेत्रांचा समावेश असून अहेरी विधानसभा क्षेत्र हा अतिसंवेदनशील व नक्षलग्रस्त म्हणून ओळखला जातो. या विधानसभा क्षेत्रात मुलचेरा, एटापल्ली, भामरागड, अहेरी आणि सिरोंचा या पाच तालुक्यांचा समावेश आहे. या पाचही तालुक्यात अनेक मतदान केंद्र हे अतिसंवेदनशील आहेत. त्यामुळे पोलिंग



पार्ट्यांना सुरक्षितरित्या तीन दिवस अगोदरच बेसकॅम्प वर पाठविले जात आहेत. त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी संजय दैने यांच्या मार्गदर्शनाखाली अहेरीचे साहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी आदित्य जिवने यांच्या नेतृत्वाखाली योग्य असे नियोजन केले जात आहे. विशेष म्हणजे, १६ ते १८ एप्रिलपर्यंत तीन दिवस पोलिंग पार्ट्या विविध भागात रवाना करण्यात येणार आहेत. पोलिंग पार्ट्यांना सोडण्यासाठी वायूसेनेचे दोन हेलिकॉप्टर एस. बी. कॉलेजच्या पटांगणात तयार केलेल्या हेलिपॅडवर सोमवारी दुपारीच दाखल झाले.या परिसरात मोठ्या प्रमाणात पोलिसांचा चोख बंदोबस्त लावण्यात आला आहे. पहिल्यांदाच वायुसेनेचे हेलिकॉप्टर या लोकसभा निवडणुकीत वापरण्यात आले आहेत. अहेरीचे साहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी आदित्य जिवने यांची प्रत्येक बाबीवर बारीक नजर आहे. सध्या तीन दिवस सुरक्षितपणे पोलिंग पाटर्या बेसकॅम्पवर रवाना करण्याचे काम सुरू असून जिल्हा पोलिस अधिक्षक निलोत्पल व अप्पर अधीक्षक यातीश देशमुख, आणि अहेरी चे अप्पर पोलीस अधीक्षक एम. रमेश यांच्या मार्गदर्शनात निवडणूक पथकांना सुरक्षीतपणे पोहचविण्यात येत आहे.या कामात पाच तालुक्याचे तहसीलदार, नायब तहसीलदार आणि पोलीस प्रशासन सज्ज आहेत.

## लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अप्पर जिल्हाधिकारी यांची धडक कारवाई

### अवैध वाळू उपसा करणारी चार वाहने जप्त;रेती तस्करांचे धाबे दणाणले

**गडचिरोली । प्रतिनिधी**

जिल्ह्यात चामोर्शी तालुक्यातील गणपूर घाटावर अवैध वाळू उपसा करणारी चार वाहने काल जिल्हा भरारी पथकाने जप्त केली आहेत. अपर जिल्हाधिकारी विजय भाकरे यांचे मार्गदर्शनात जिल्हा खनिकर्म अधिकारी शबर्डे, मंडळ अधिकारी नवनाथ अतकरे, तलाठी सुधीर बाविस्कर यांच्या पथकाने निवडणुकीच्या व्यस्त कामातही ही कारवाई केली.

जप्त करण्यात आलेल्या चारही वाहने ट्रॅक्टर असून चालक गणेश यशवंत वार, भारत राऊत, सुभाष मंढरे आणि सचिन राऊत यांना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे.जिल्हयात मागील वित्तीय वर्षात १७२ वाहन जप्त करण्यात येवून त्यातील २४८ प्रकरणात २ कोटी ६१ लाख रुपये दंड आकारण्यात आला होता, त्यापैकी १ कोटी ३९ लक्ष रुपये दंड वसुल करण्यात आला आहे.जिल्हयात इंदिरा घरकुल योजना, पंतप्रधान घरकुल योजना व रमाई घरकुल योजने अंतर्गत दुर्बल घटकातील लोकांना मंजूर झालेल्या घरकुलांच्या बांधकामासाठी ५ ब्रास पर्यंत रेती विना मुल्य उपलब्ध करुन देणेसाठी जिल्हयातील



आमगांव, (ता. चामोर्शी), थुटेबोडी व वैरागड (ता. आरमोरी), चोप (ता. देसाईगंज) नगरम–१ (ता. सिरोंचा) या रेती घाटांमधून रेती उपलब्ध करुन देण्याचे निर्देश देण्यात आले होते. मात्र सदर घाटावरुन प्रत्यक्ष बांधकामाचे ठिकाणी रेती वाहतूक करणे खर्चीक ठरत असल्याने गावालगतच्या रेती उपलब्ध असलेल्या नदी–नाल्यातून ५ ब्रास रेती उपलब्ध करुन देण्या साठी कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

तहसिलदार व संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती यांचे संयुक्त स्वाक्षरीने गावालगत उपलब्ध नदी–नाल्यांचे प्रस्ताव दिनांक ३० एप्रिलपर्यंत सादर करण्याचे निर्देश अतिरिक्त जिल्हाधिकारी विजय भाकरे यांनी दिले आहेत.

### पोंभुर्णा काँग्रेस तालुकाध्यक्षाचा भाजपात प्रवेश

## विकासासाठी ना. सुधीर मुनगंटीवार यांच्यासोबत–रविंद्र मरपल्लीवार

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर–वणी–आर्णी लोकसभा मतदार संघातील भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई (आठवले गट), पीपल्स रिपब्लिकन पार्टी (कवाडे गट), रासप मित्रपक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या विकास कामावर प्रभावित होऊन विविध संघटनाचा पाठींबा , समर्थन वाढत असून त्यांच्यावर विश्वास ठेवत भारतीय जनता पक्षात प्रवेश करीत आहेत.सर्वांगीण विकासाचा वसा घेतलेले ना. मुनगंटीवार यांच्या विक्रमी विजयाचा निर्धार करत सोमवार, १५ एप्रिल रोजी काँग्रेस कमिटीचे पोंभुर्णा तालुका अध्यक्ष व बाजार समितीचे सभापती रविंद्र मरपल्लीवार यांनी त्यांच्या सहका–यांसह भाजपात प्रवेश केला.

यावेळी बाजार समितीच्या संचालक भारती बदन, सुनंदा गोहणे व श्यामसुंदर बदन यांच्यास अनेक कार्यकर्त्यांनी भाजपात प्रवेश केला . ना. सुधीर मुनगंटीवार यांनी भाजपाचा दुपट्टा देऊन सर्वांचे स्वागत केले व त्यांचा विश्वास खरा ठरवण्यासाठी



दिवसरात्र झटेन, असे आश्वासन दिले. यावेळी मोठ्या संख्येने भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी आणि ना. सुधीर मुनगंटीवार यांचा विकासाचा वेग पाहून मी आज भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश केला आहे. विकासासाठी आम्ही ना. मुनगंटीवार यांच्यासोबत असून त्यांच्या नेतृत्वात चंद्रपूर–वणी–आर्णी लोकसभा क्षेत्राचा विकास होईल, असा विश्वास आहे, असे मत रविंद्र मरपल्लीवार यांनी व्यक्त केले.

## मतदानाच्या दिवशी सुट्टी जाहीर

**गडचिरोली । प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाने १६ मार्च २०२४ रोजी जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार १२–गडचिरोली–चिमुर लोकसभा मतदारसंघात १९ एप्रिल २०२४ रोजी पहिल्या टप्प्यात मतदान होणार आहे. १८ वर्षावरील नोंदणी झालेल्या सर्व नागरिकांना मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी भारत निवडणूक आयोग यांच्या २२ मार्च २०२४ च्या परिपत्रकानुसार गडचिरोली–चिमुर लोकसभा मतदारसंघात १९ एप्रिल रोजी मतदान करण्यास सुटी जाहीर करण्यात आली आहे. मतदानाच्या दिवशी सर्वसाधारणपणे मतदारांना त्यांच्या मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी सुट्टी देण्यात येते किंवा कामाच्या ठिकाणी योग्य ती सवलत देण्यात येते. मात्र गेल्या काही निवडणुकांमध्ये संस्था ,खासगी आस्थापना इत्यादी भरपगारी सुट्टी किंवा सवलत देत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे अनेक मतदारांना मतदानापासून वंचित राहावे लागते. ही बाब लक्षात घेता, या लोकसभा निवडणुकीत कामगार, अधिकारी व कर्मचाऱ्यांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी मतदानाच्या दिवशी भरपगारी सुट्टी मिळणार आहे.

ही सुट्टी उद्योग विभागांतर्गत येणाऱ्या सर्व उद्योग समूह, महामंडळे, कंपन्या व संस्था, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना आदींना लागू राहणार आहे. अपवादात्मक परिस्थितीत कामगार, अधिकारी, कर्मचाऱ्यांना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर, मतदान क्षेत्रातील कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी कमीत कमी दोन तासांची सवलत दिली जाणार आहे. मात्र त्याबाबत संबंधित जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांची परवानगी घेणे आवश्यक राहील.

कोणत्याही परिस्थितीत मतदारांना मतदानासाठी किमान दोन तासांची सवलत मिळेल, याची दक्षता संबंधित आस्थापनांनी घेणे आवश्यक राहणार आहे. उद्योग विभागांतर्गत येणारे सर्व महामंडळे, उद्योग समूह, कंपन्या व संस्थांमध्ये, औद्योगिक उपक्रम इत्यादींच्या आस्थापनांना या सूचनांचे योग्य अनुपालन होईल, याची काटेकोरपणे खबरदारी घ्यावी लागणार आहे. मतदानाच्या हक्कापासून कोणताही शासकीय कर्मचारी वंचित राहू नये, तसेच सर्व कार्यालय प्रमुख, अधिकारी, कर्मचारी, व्यावसायिक संस्था, व्यापारी केंद्र, औद्योगिक कारखाने इत्यादीमध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या निदर्शनास ही बाब आणून देण्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी संजय दैने यांनी सूचित केले आहे.

## मतदानाच्या दिवशी आठवडी बाजार बंद

**गडचिरोली । प्रतिनिधी**

सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीत मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा याकरिता मतदानाचे दिवशी (१९ एप्रिल २०२४) आठवडी बाजार बंद ठेवण्याचे आदेश जिल्हादंडाधिकारी संजय दैने यांनी निर्गमित केले आहे.

१२ गडचिरोली–चिमुर (अ.ज.) लोकसभा मतदारसंघात, सार्वत्रिक निवडणूक–२०२४ करीता १९ एप्रिल २०२४ रोजी मतदान घेण्यात येणार आहे. सर्व मतदारांना त्यांच्या मतदानाचा हक्क बजावता यावा, याकरिता शासनातर्फे आवाहन करण्यात आलेले आहे. मतदानाच्या दिवशी जिह्यातील अनेक गांवामध्ये आठवडी बाजार आहे. नागरीकांच्या गर्दीमुळे ठिकठिकाणी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे जनतेच्या सोयी–सुविधेकरिता तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी मतदानाचे दिवशी गडचिरोली जिल्ह्यात भरणारे आठवडी बाजार बंद ठेवण्याचे आदेश जिल्हादंडाधिकारी, गडचिरोली यांनी दिले आहेत. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरूद्ध कायद्यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल असेही आदेशात नमुद करण्यात आले आहे.

## जिल्ह्यात कलम १४४ लागु

**गडचिरोली । प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाने दिनांक १६ मार्च, २०२४ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकान्वये लोकसभा सार्वत्रिक निवडणूक– २०२४ चा कार्यक्रम घोषित केला आहे. त्यानुसार १२– गडचिरोली – चिमुर (अ.ज.) लोकसभा मतदार संघ, सार्वत्रिक निवडणूक–२०२४ करिता मतदान दिनांक १९ एप्रिल, २०२४ रोजी व मतमोजणी दिनांक ०४ जुन, २०२४ रोजी आहे. सदर निवडणूक खुल्या व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी मतदान प्रक्रिया व मतमोजणी शांततेत पार पाडणे आवश्यक असल्याने सदर निवडणूक कालावधीत सार्वजनिक अथवा खाजगी मालमत्तेस क्षती पोहचण्यास अथवा मानवी जिविताला, आरोग्याला किंवा सुरक्षिततेला संकट उत्पन्न होण्यास अथवा प्रशांतता बिघडवण्यास अथवा दंग्यास किंवा दंगलीस प्रतिबंध करण्यासाठी या आदेशाद्वारे निर्देश देणे आवश्यक आहे असे मत झाले आहे. जिल्हादंडाधिकारी, गडचिरोली, संजय दैने यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन पुढील प्रतिबंधात्मक आदेश जारी करीत आहे.

मतदान व मतमोजणी केंद्राचे परिसरात प्रवेश करतेवेळी पाच पेक्षा जास्त व्यक्ती (संबंधित अधिकारी व कर्मचारी वगळून) एकत्रितरित्या प्रवेश करणार नाहीत. कोणत्याही प्रकारच्या घोषणा देता येणार नाहीत. मतदान व मतमोजणी केंद्राचे परिसरात उमेदवार, त्यांचे प्रतिनिधी अथवा अन्य व्यक्तीकडून शांततेस बाधा निर्माण होईल असे कृत्य करता येणार नाही. मतदान व मतमोजणी केंद्राचे परिसरात मोबाईल फोन घेऊन प्रवेश करण्यास व निषिध्द वस्तु बाळगण्यास मनाई असेल. मतदान व मतमोजणी सुरळीतपणे व शांततेच्या वातावरणामध्ये पार पाडण्यासाठी कोणतीही बाधा उत्पन्न करता येणार नाही. मतदान व मतमोजणी केंद्रावर कोणत्याही अनाधिकृत व्यक्तीस, वाहनास प्रवेशास मनाई राहिल. सदर आदेश पुढील दिनांक व कालावधी करितालागू,अंमलात राहील.

मतदान,संबंधित मतदान केंद्रावर दिनांक १९ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ७.०० ते ३.०० वा.पर्यंत, मतमोजणी, मतमोजणीचे ठिकाणी दिनांक ०४ जुन २०२४ रोजी सकाळी ०७.०० ते निकाल घोषित करेपर्यंत आदेशाचा अंमल राहील. सदर आदेश आज दिनांक ०४ एप्रिल २०२४ रोजी जिल्हादंडाधिकारी, गडचिरोली यांच्या सही व शिक्कानिशी निर्गमित करण्यात आले. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या विरुध्द कायद्यातील तरतुदीनुसार योग्य कार्यवाही करण्यात येईल. असे जिल्हादंडाधिकारी, गडचिरोली संजय दैने यांनी कळविले आहे.

### शेतकऱ्यांनी मुदतीपूर्वी आपली नोंदणी संबंधित खरेदी केंद्रावर करावी

**गडचिरोली :** गडचिरोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येते की, आधारभुत किंमत खरेदी योजनेंतर्गत खरीप व रब्बी पणन हंगाम २०२३–२४ मधील शेतकरी उत्पादित धान,भरडधान्य आदिवासी विकास महामंडळास विक्रीकरीता प्रादेशिक कार्यालय, गडचिरोलीचे कार्यक्षेत्रांर्गत ५४ व अहेरी कार्यक्षेत्रांतर्गत ३९ असे एकुण ९३ धान खरेदी केंद्र जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी मंजुर केलेले आहे.

# गंगूबाई उर्फ अम्माच्या हस्ते अम्मा की दुकानचे उद्घाटन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

निराधार गरजु महिलांना स्वयंरोजगारातुन आत्मनिर्भर बनविण्यासाठी स्व. प्रभाताई चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने आमदार किशोर जोरगेवार यांच्या संकल्पनेतून अम्मा की दुकान हा उपक्रम राबविल्या जात आहे. सदर उपक्रमाअंतर्गत बंगाली कॅम्प येथील मालती देवनाथ या निराधार महिलेला अम्मा का दुकान उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

सदर दुकानाचे गंगुबाई उर्फ अम्मा जोरगेवार यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी यंग चांदा ब्रिगेडच्या महिला शहर संघटिका वंदना हातगावकर, बंगाली समाज महिला शहर प्रमुख सविता दंढारे, युवती प्रमुख भाग्यश्री हांडे, सायली येरणे, अल्पसंख्याक विभागाच्या महिला शहर प्रमख कौसर खान, आशा देशमूख, विमल कातकर, शमा काजी, निलिमा वनकर, अनिता झाडे आदिंची उपस्थिती होती.

आमदार किशोर जोरगेवार यांच्या वतीने अनेक समाज उपयोगी उपक्रम राबविले जात आहे. त्यांच्या संकल्पनेतून सुरु असलेल्या अम्मा का टिफिन हा उपक्रम राज्यभर चर्चीला जात आहे. सदर उपक्रमा अंतर्गत गरजवंताच्या घरी दररोज जेवणाचा टिफिन पोहचविला जात आहे. दरम्यान आता त्यांच्या संकल्पनेतून स्व. प्रभाताई चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अम्मा कि दुकान हा उपक्रम सुरु करण्यात आला आहे.

निराधार महिला आणि दिव्यांग बांधवांन समोर रोजगाराचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. स्वताचा रोजगार सुरु करण्यासाठी लागणारे भांडवल त्यांच्याकडे नसल्याने त्यांच्या पुढे मोठी अडचण निर्माण होत आहे. त्यामुळे दुस-यांकडे अल्पश्या वेतनात काम करण्याची वेळ त्यांच्यावर ओढावली आहे. ही बाब लक्षात घेता आमदार किशोर जोरगेवार यांच्या संकल्पनेतून सदर उपक्रम सुरु करण्यात आला असून स्वयंरोजगारातुन समाजातील या घटकाला आत्मनिर्भर बनविण्याचा प्रयत्न केल्या जात आहे. विशेष म्हणजे. अम्मा स्वता फुटपाथवर टोपल्या विकण्याचे काम करते. अशात स्वताचे दुकान नसल्यास उद्भवणा-या त्रासाचा तिला चांगला अनुभव आहे.

दरम्यान सदर उपक्रमा अंतर्गत मतदार संघातील दोन दिव्यांग बांधवांना दुकान उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तर आज शहरातील बंगाली कॅम्प येथील मालती देवनाथ या निराधार महिलेला दुकान उपलब्ध करुन देण्यात आली. आमदार किशोर जोरगेवार यांच्या मातोश्री अम्मा यांनी या दुकानाचे उद्घाटन केले. अम्मा स्वतः फुटपाथवर बसुन टोपल्या विकते त्यामुळे फूटपाथवर दूकान लावतांना येणा-या अडचणींची तिला जाण आहे. त्यामुळे आपण सदर उपक्रम सुरु केला असल्याचे अम्मा यांनी म्हटले आहे. ग्रामीण भागातील दिव्यांग बांधवांना आणि शहरी भागात निराधार गरजु महिलांना सदर दुकान देणार असल्याचेही अम्मा यांनी म्हटले आहे.




# धैर्यशील मोहितेंनी साथ सोडताच फडणवीसांकडून डॅमेज कंट्रोल:उत्तमराव जानकरांशी तासभर खलबतं

**नागपूर**–माढा लोकसभा मतदारसंघ पुन्हा मिळवण्यासाठी शरद पवारांनी भाजपच्या धैर्यशील मोहिते पाटील यांच्या हाती तुतारी देत महायुतीच्या अडचणी वाढवल्या आहेत. तर दुसरीकडे सोलापुरातील प्रसिद्ध धनगर नेते उत्तमराव जानकर मोहिते पाटील यांना पाठिंबा देण्याच्या तयारीत आहे. त्यांची नाराजी पाहता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस डॅमेज कंट्रोल करीत उत्तमराव जानकर यांना नागपुरात बोलावून घेत त्यांच्याशी तासभर चर्चा केली.



फडणवीसांनी जानकर यांना नागपुरला बोलावून घेतले. त्यांच्यासाठी बारामतीला खास चार्टर्ड प्लेन पाठवण्यात आले होते. या विमानाने जानकर, भाजप खासदार रणजीतसिंह नाईक-निंबाळकर, आमदार जयकुमार गोरे, शहाजी बापू पाटील नागपुरला आले. फडणवीस यांनी नागपुरात या सगळ्या नेत्यांची भेट घेत त्यांच्याशी चर्चा केली. फडणवीस यांनी जानकर यांच्यासोबत तासभर संवाद साधला.धैर्यशील मोहिते पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षात प्रवेश केल्यानंतर देवेंद्र फडणवीसांनी सोलापूर जिल्ह्यात लक्ष घातले आहे. उत्तमराव जानकर आणि माझे ठरले असल्याचे जयंत पाटील यांनी सांगितल्यानंतर फडणवीसांनी तातडीने जानकर यांना नागपूरला बोलावून घेतले. दोघांमध्ये एक तास बैठक झाली. त्याबद्दल जानकर यांनी माहिती दिली.देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीनंतर उत्तमराव जानकर म्हणाले की, निश्चितपणाने माढा आणि सोलापूर लोकसभा मतदारसंघाचा विषय होता. त्या मतदारसंघाच्या संदर्भाने आम्ही फडणवीसांना भेटायला नागपूरमध्ये आलो. फडणवीस यांच्यासोबत आमची एक तास बैठक झाली.

# जिल्ह्यात कलम १४४ लागु

**गडचिरोली । प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाने दिनांक १६ मार्च, २०२४ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकान्वये लोकसभा सार्वत्रिक निवडणूक- २०२४ चा कार्यक्रम घोषित केला आहे. त्यानुसार १२- गडचिरोली - चिमुर (अ.ज.) लोकसभा मतदार संघ, सार्वत्रिक निवडणूक-२०२४ करिता मतदान दिनांक १९ एप्रिल, २०२४ रोजी व मतमोजणी दिनांक ०४ जुन, २०२४ रोजी आहे. सदर निवडणूक खुल्या व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी मतदान प्रक्रिया व मतमोजणी शांततेत पार पाडणे आवश्यक असल्याने सदर निवडणूक कालावधीत सार्वजनिक अथवा खाजगी मालमत्तेस क्षती पोहचण्यास अथवा मानवी जिविताला, आरोग्याला किंवा सुरक्षिततेला संकट उत्पन्न होण्यास अथवा प्रशांतता बिघडवण्यास अथवा दंग्यास किंवा दंगलीस प्रतिबंध करण्यासाठी या आदेशाद्वारे निर्देश देणे आवश्यक आहे असे मत झाले आहे.

जिल्हादंडाधिकारी, गडचिरोली, संजय दैने यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन पुढील प्रतिबंधात्मक आदेश जारी करीत आहे. मतदान व मतमोजणी केंद्राचे परिसरात प्रवेश करतेवेळी पाच पेक्षा जास्त व्यक्ती (संबंधित अधिकारी व कर्मचारी वगळून) एकत्रितरित्या प्रवेश करणार नाहीत. कोणत्याही प्रकारच्या घोषणा देता येणार नाहीत. मतदान व मतमोजणी केंद्राचे परिसरात उमेदवार, त्यांचे प्रतिनिधी अथवा अन्य व्यक्तीकडून शांततेस बाधा निर्माण होईल असे कृत्य करता येणार नाही. मतदान व मतमोजणी केंद्राचे परिसरात मोबाईल फोन घेऊन प्रवेश करण्यास व निषिध्द वस्तु बाळगण्यास मनाई असेल. मतदान व मतमोजणी सुरळीतपणे व शांततेच्या वातावरणामध्ये पार पाडण्यासाठी कोणतीही बाधा उत्पन्न करता येणार नाही. मतदान व मतमोजणी केंद्रावर कोणत्याही अनाधिकृत व्यक्तीस, वाहनास प्रवेशास मनाई राहिल. सदर आदेश पुढील दिनांक व कालावधी करितालागू,अंमलात राहील.

मतदान,संबंधित मतदान केंद्रावर दिनांक १९ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ७.०० ते ३.०० वा.पर्यंत, मतमोजणी, मतमोजणीचे ठिकाणी दिनांक ०४ जुन २०२४ रोजी सकाळी ०७.०० ते निकाल घोषित करेपर्यंत आदेशाचा अंमल राहील. सदर आदेश आज दिनांक ०४ एप्रिल २०२४ रोजी जिल्हादंडाधिकारी, गडचिरोली यांच्या सही व शिक्कानिशी निर्गमित करण्यात आले. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या विरुध्द कायद्यातील तरतुदीनुसार योग्य कार्यवाही करण्यात येईल. असे जिल्हादंडाधिकारी, गडचिरोली संजय दैने यांनी कळविले आहे.

# मोदी सत्तेत आल्यावर विधानसभेवर परिणाम होणार:४ जूननंतर इच्छुकांसाठी आमची दारं उघडी–प्रफुल्ल पटेल

**नागपूर**–मोदी प्रचंड बहुमताने देशाचे सत्तेवर पुन्हा आल्यानंतर त्याचे परिणाम महाराष्ट्राच्या विधानसभेवर होणारच आहेत. त्यावेळी आमचे दार उघडे आहेत असे सूचक विधान राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाचे नेते प्रफुल्ल पटेल यांनी केले आहे. सध्याच्या राजकीय परिस्थितीवर प्रफुल पटेल यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलतांना अनेक मोठे गौप्यस्फोट केले आहेत.

यावेळी बोलतांना ते म्हणाले, ''एकदा मोदी प्रचंड बहुमताने देशाच्या सत्तेवर पुन्हा आल्यानंतर त्याचे परिणाम महाराष्ट्राच्या विधानसभेवर होणारच आहे. त्यावेळी पाहू आमच्यासोबत यायला कोण तयार होते. राजकारणात दार उघडे ठेवावेच लागतात आणि आमचे दार उघडे आहे. तेव्हा कोणी येऊ इच्छित असेल तर जरूर विचार करता येईल त्याला सन्मानाने आम्ही आमच्यात सामील करून घेऊ'', असे पटेल म्हणालेत. दरम्यान, ''२०१४ मध्ये आम्ही भाजपला पाठिंबा दिला होता. २०१७ मध्ये परत तसे प्रयत्न झाले. २०१९ मध्ये तर अजित पवारांनी फडणवीसांसोबत शपथ देखील घेतली होती. तेव्हा एक महिना राष्ट्रपती शासन लागल्यानंतर आपण एकत्रित येऊ आणि सरकार स्थापन करू असे भाजपने आमच्याशी चर्चा करून ठरवले होते. तेव्हा उद्धव ठाकरे यांच्यासोबत जाण्याचा काही प्रश्नच नव्हता. मात्र एका महिन्यात चर्चा होऊन आम्ही वेगळ्या मार्गावर गेलो'',



असे प्रफुल्ल पटेल यांनी सांगितले. पुढे ते म्हणाले, ''२०१४ पासूनच एकत्रित यायला पाहिजे होते. मात्र २०१९ मध्ये आम्हाला शिवसेनेसोबत जायचे होते तर आम्ही भाजप सोबत चर्चा करायला नको होती. त्यावेळी आम्ही दोन्हीकडे चर्चा करत होतो'', असे प्रफुल पटेल म्हणाले.

महायुतीतील जागावाटपाच्या तिढ्यावर बोलताना प्रफुल पटेल म्हणाले, ''महायुतीत आम्ही आल्यानंतर काही जागांचा प्रश्न निर्माण झाला आहे. भाजपच्या २४ जागा आणि शिंदे यांच्या १३ जिंकलेल्या जागांसंदर्भात कोणताही वाद नाही. तर आमच्या पारंपरिक चार जागा आहे. मात्र त्यापेक्षा जास्त जागांची आमची मागणी आहे. त्याठिकाणी आमची ताकद आहे, आमचे आमदार आहेत'', असे प्रफुल्ल पटेल म्हणाले.नाशिक आणि साताऱ्याच्या जागेविषयी बोलताना प्रफुल पटेल म्हणाले, ''नाशिक जरी एकनाथ शिंदे यांची जागा असली तरी त्यांनी एक जागा कमी घेण्यास मान्य केले.

# धारावी पुनर्वसन प्रकल्पावर भाजपाकडून डॅमेज कंट्रोल करण्याचा प्रयत्न – वर्षा गायकवाड

**मुंबई**–धारावी पुनर्वसन प्रकल्पाच्या नावाखाली बेघर करण्याचा मोदानी कंपनीचा डाव उघड आहे. जनतेत मोदानी विरोधात प्रचंड संताप आहे. आपल्या हक्काच्या घरांसाठी, धारावीकरांची एकजूट पाहून मोदानी कंपनी चांगलीच हादरली आहे. लोकसभा निवडणुकीत धारावीकर आपल्यावर झालेल्या अन्यायाचा हिशोब चुकता करतील हे भाजपाच्या लक्षात आल्यानेच भितीपोटी भाजपाकडून डॅमेज कंट्रोल करण्याचा प्रयत्न सुरु आहे, असे मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा व धारावीच्या आमदार प्रा. वर्षा गायकवाड यांनी म्हटले आहे.

यासंदर्भात प्रतिक्रिया देताना वर्षा गायकवाड म्हणाल्या की, धारावीकरांची एकजुट पाहून भाजपा आता खोटं बोल पण रेटून बोल या नीतीचा अवलंब करत आहे. ऊठझझड च्या सर्वेक्षणात 'अपात्र' ठरणाऱ्या लाखो लोकांना बाहेर काढण्यात येईल हा भ्रम आहे आणि



त्यावर विश्वास ठेवू नये असे भाजपाचे मुंबई अध्यक्ष आशिष शेलार यांनी म्हटले आहे. असे असेल तर भाजपा सरकारने यासंदर्भात काढलेले ऋठ आणि शासन निर्णय चुकीचे आणि भ्रम पसरवणारे आहेत असे शेलार यांनी जाहीर करावे? शेलारांनी चुकीचा प्रचार करू नये.

# १५ एप्रिल रोजी माढा लोकसभेचा भरणार अर्ज

## इंजि.रामचंद्र घुटुकडे यांच्या भव्य रॅलीचे आयोजन व शक्तिप्रदर्शन

**घेरडी । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणूकीची रणधुमाळी सुरु झाली असून शुक्रवारी इंजि रामचंद्र घुटूकडे यांनी लोकसभा उमेदवारीसाठी एक अर्ज खरेदी केला. गेली कित्येक वर्षे झाले धनगर ,वंचित तसेच भटकेविमुक्त समाजाला संसदेत प्रतिनिधित्व मिळालेले नाही.

एक उच्चशिक्षित तरुण उमेदवार इंजि रामचंद्र घुटूकडे हे गेली १० वर्षे झाले सामाजिक व राजकीय चळवळीत काम करीत आसून त्यांना समाजाच्या प्रश्नांची जान आहे . कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना त्यांनी २०१९ ची लोकसभा लोकांच्या माध्यमातून लढवली होती. सध्या त्यांनी पुर्ण तयारी केलेली आसुन ते पुर्ण ताकदिने लढणार आसल्याचे त्यांनी सांगितले. प्रस्तापितांच्या विरोधात माझी लढाई आसुन शेवटच्या श्वासापर्यंत आम्ही ती लढत आसून जो पर्यंत गोर गरीबाचा माणूस संसदभवनात जात नाही तो पर्यंत हि लढाई चालू आसल्यांचे त्यांनी सांगीतले.२०१९ नंतर खासदार रणजितसिंह निंबाळकर निवडून आले, पण सामान्य शेतकऱ्यांचा मात्र भ्रमनिरास झाला आहे. रणजितसिंह निंबाळकर खासदार म्हणून नेतृत्व केले तरी अजून सुद्धा माण-खटाव, सांगोला, माळशिरस, मधील लोकांना पाण्यासाठी वणवण फिरावं लागते. माढा लोकसभा मतदारसंघातील तरुणांना रोजगार नसल्याने पुणे, बारामती, सोलापूर, मुंबई, सांगली या शहरात स्थलांतर करावे लागते. माण-खटाव, सांगोला, माळशिरस, माढा या




दुष्काळी तालुक्यातील वैद्यकीय सुविधा गरिबांना मिळतील असे वैद्यकीय दवाखाना उभारता आला नाही. माण, खटाव, सांगोला या तिन्ही तालुके औद्योगिक वसाहत उभारण्यात आलीच नाही. माण, खटाव, सांगोला हे तीन तालुके डाळिंब व कांदा चा उत्पादनासाठी बाजारपेठ निर्माण केली नाही. दुष्काळ भागात वैद्यकीय शिक्षणाची संस्था उभारण्यात आली नाही. माण, खटाव या तालुक्यात रेल्वेचे जाळे उभारण्यात आले नाही. माढा मतदारसंघात मेंढपाळ व्यवसायाचे प्रमाण अधिक असताना मेंढ्या, शेळ्यां,जनावरांची बाजारपेठ निर्माण केली नाही.खासदार निंबाळकरांच्या उमेदवारीचे माढ्यातही पडसाद उमटू लागलेत. माढ्यात विकासगंगा आणतील असे मतदारांना वाटले होते. मात्र, गेल्या पाच वर्षांत तसे काहीही बदल होताना दिसले नाही. असे येथील जनतेच्या प्रतिक्रियावरून दिसून येत आहे. विकास कामांना प्राधान्य न मिळाल्याने जनता नाराज असल्याचेही यावेळी बोलतांना इंजि रामचंद्र घुटुकडे यांनी म्हटले आहे.

# अधिकृत घोषणा होईपर्यंत प्रत्येक पक्षाला जागा मागण्याचा अधिकार–नाशिकच्या जागेबाबत मंत्री छगन भुजबळ

**नाशिक**–अधिकृत घोषणा होईपर्यंत प्रत्येक पक्षाला जागा मागण्याचा अधिकार आहे असे विधान मंत्री छगन भुजबळ यांनी नाशिकच्या जागेबाबत केले आहे. महायुतीमध्ये नाशिकच्या जागेवरून तिढा कायम आहे. शिंदे गट, भाजप आणि अजित पवार गटाकडून उमेदवारांचे नाव समोर येत आहे. त्यामुळे नाशिकच्या उमेदवाराची महायुतीकडून कधी घोषणा होणार ते पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

विद्यमान खासदार हेमंत गोडसे यांच्याऐवजी मंत्री छगन भुजबळ यांना नाशिकमध्ये उमेदवारी मिळणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. तर दुसरीकडे हेमंत गोडसे यांच्या कार्यकर्त्यांनी त्यांच्या प्रचाराला देखील सुरुवात केली आहे. नाशिकची जागा शिंदे गटालाच मिळणार असा वसिहवास हेमंत गोडसे यांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे सध्या नाशिकच्या जागेवरून महायुतीमध्ये चांगलीच रस्सीखेच सुरू असल्याचे चित्र आहे. याबाबत बोलतांना छगन भुजबळ म्हणाले, ''जोपर्यंत अधिकृतरित्या जाहीर होत नाही, तोपर्यंत महायुतीच्या प्रत्येक पक्षाला ही जागा मागण्याचा अधिकार आहे. ज्यावेळी उमेदवाराचे नाव जाहीर होईल, त्यावेळी आम्ही सगळे एकत्रित काम करणार आहोत. नाशिकची निवडणूक महाराष्ट्रातील निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्यात आहे. त्यामुळे इतर ठिकाणी तेथील वाटाघाटी झाल्या आहेत. काही निवडणुका दोन दिवसांत आहेत. तसेच काहींचे दुसऱ्या टप्प्यातील अर्ज भरायचे सुरू आहे. त्यामुळे तेथील वाटाघाटी आणि निवडणुकीसाठी सगळ्यांचे लक्ष आहे'', असे भुजबळ यांनी सांगितले.दरम्यान, आज भाजपने आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. याला



मोदींची गॅरंटी असे नाव देण्यात आले आहे. यावर भुजबळ यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ''भाजपाने जाहीरनाम्यात काही सांगितले असेल तर ते पूर्णदेखील करतील. अनेक गोष्टींची पूर्तता त्यांनी केलेली आहे. शेतकऱ्यांना सुद्धा दरवर्षी ठराविक रक्कम पीएम किसान योजेनेतून खात्यात जाते. घरांच्या योजनेसाठी १२ हजार कोटी रुपये केंद्र सरकारने महाराष्ट्राला दिले आहेत. यानंतर राज्य सरकारनेही अनेक हिताचे निर्णय घेतले आहेत. महायुतीचा फायदा हा भारतातील जनतेला होत आहे'', असे छगन भुजबळ म्हणाले.दरम्यान, उमेदवारीसाठी हेमंत गोडसे यांनी आज पुन्हा एकदा मुंबई गाठले आहे. नाशिकमधून उमेदवारी मिळण्यासाठी ते पुन्हा एकदा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेणार आहेत. तर छगन भुजबळ यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त गाठीभेटी घेतल्या आहेत. छगन भुजबळांकडून एक प्रकारे प्रचाराची सुरुवात झाल्याची चर्चा आता नाशिकमध्ये रंगू लागली आहे. यामुळे नाशिकचे राजकीय वातावरण तापल्याचे चित्र आहे.

# रोहित पवारांनी घराणेशाहीवरून बोलणं म्हणजे विनोदच:त्यांच्या घरातील लोक एकत्र बसवले तर पक्षच तयार होईल; सुजय विखे

**अहमदनगर**–पंतप्रधान नरेंद्र मोदींनी प्रचार सभांमध्ये घराणेशाहीचा मुद्दा उपस्थित करत काँग्रेसवर सडकून टीका केली होती. या मुद्द्यावरून आता राजकीय प्रतिक्रिया येताना दिसत आहे. तर आता शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी घराणेशाहीवरून भाजपवर टीका केली. तर रोहित पवारांच्या टीकेला आता खासदार सुजय विखे पाटील यांनी प्रत्युत्तर दिले आहे. त्यामुळे या दोन्ही नेत्यांमध्ये चांगलीच जुंपलेली पाहायला मिळत आहे. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकारण चांगलेच तापल्याचे चित्र आहे.

घराणेशाहीच्या मुद्द्यावरून रोहित पवार माध्यमांशी संवाद साधताना म्हणाले की, सध्या देशभरात जे खासदार आहेत. त्यातील ७० टक्के घराणेशाहीवाले खासदार हे भाजपमध्ये





असल्याची टीका, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी केली आहे. देवेंद्र फडणवीस, पंकजा मुंडे, सुजय विखे पाटील हे घराणेशाहीतील आहेत. अशी ७० ते ८० नाव सांगता येतील, असं रोहित पवारांनी म्हटले आहे. सोबतच भाजपचे भाषणातील मुद्दे वेगळे असतात त्यातच खोटं बोल पण रेटून बोल, अशी स्थिती असल्याची टीका रोहित पवारांनी केली आहे.तर भाजप खासदार सुजय विखे पाटलांनी रोहित पवारांच्या टीकेचा खरपूस समाचार घेतला आहे. सुजय विखे पाटील म्हणाले की, एखाद्या व्यक्तीला एखाद्या कारणाने तिकीट मिळू शकते. पण शेवटी जनतेच्या मतांवरच उमेदवार निवडून येतो.सध्या जी घराणे राजकारणात टिकली आहेत ते केवळ जनतेने दाखवलेल्या विश्वासावर टिकली आहेत. कुणीही ते जनतेवर लादलेली नाहीत. त्यातच रोहित पवारांनी या विषयावर बोलणे म्हणजे मोठा विनोद आहे. कारण त्यांच्या घरातील एका खोलीत सर्व लोक बसवले तर पूर्ण पक्षच एका घरात बसेल, असा खोचक टोला सुजय विखे पाटलांनी रोहित पवारांना लगावला आहे.

## घुग्गुस येथील जाहीर सभेला उसळली रेकॉर्डब्रेक गर्दी

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान करणाऱ्या काँग्रेसला धडा शिकवा

## ना.सुधीर मुनगंटीवार यांनी घेतला काँग्रेसचा खरपूस समाचार







**चंद्रपूर । प्रतिनिधी**

काँग्रेस हे जळते घर आहे, असे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारखे कार्य काँग्रेसला कधीच जमले नाही. काँग्रेसने कायम बाबासाहेबांचा अपमान केला. एवढेच नव्हे तर काँग्रेसने दोनवेळा त्यांचा पराभवही केला. त्यामुळे बाबासाहेबांचा पराभव करणाऱ्या काँग्रेसचा चंद्रपूर लोकसभा निवडणुकीत पराभव करा आणि त्यांना धडा शिकवा, असे आवाहन चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदार संघातील भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई (आठवले गट), पिरीपा (कवाडे गट), रासप मित्रपक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार ना. सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

चंद्रपूर लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप महायुतीचे उमेदवार ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रचारार्थ घुग्गुस येथे जाहीर सभा पार पडली. यावेळी जाहीर सभेला माजी भाजपा जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे, विवेक बोढे, विनोद चौधरी, निरीक्षण तांडरा, साजन गोहणे, हसन शेख, इर्शाद कुरेशी, चिंतानल बोगा, श्रीनिवास बोचकुला, रवी डिकोंडा, अनिल मंत्रीवार, संतोष नुने, श्रीनिवास रामटेके यांच्यासह शेकडो कार्यकर्ते आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या जाहीर सभेला संबोधित करताना ना. मुनगंटीवार यांनी काँग्रेस पक्षाचा खरपूस समाचार घेतला. पुढे बोलताना ते म्हणाले, 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा काँग्रेस पक्षाने १९५२ सालच्या लोकसभेच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत मुंबईत आणि १९५४ च्या भंडारा लोकसभा पोटनिवडणुकीत पराभव केला होता. काँग्रेसमध्ये अनेक बॅरिस्टर्स होते पण डॉ. आंबेडकरांचा अभ्यास आणि विद्वत्ता बघता कदाचित ते राजकीयदृष्ट्या गैरसोयीचे होईल, अशी भावना काँग्रेसची होती. जर बाबासाहेबांचे वजन वाढले तर कदाचित काँग्रेसला दलित बांधवांनाही सत्तेत समाविष्ट करून घ्यावे लागेल, या कारणाने काँग्रेसने आंबेडकरांना बिनविरोध निवडून आणले नाही, त्यांचाच पराभव केला. जो काँग्रेस पक्ष आपल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पराभव करतो, वारंवार अपमान करतो, त्या काँग्रेसला तुम्ही मतदान कसे करू शकता? असा प्रश्न त्यांनी घुग्गुस येथील जनतेला विचारला. येत्या चंद्रपूर लोकसभा निवडणुकीत १९ तारखेला भाजप महायुतीला मतदान करून बाबासाहेबांच्या अपमानाचा सूड घ्या, असे आवाहन त्यांनी केले.

काँग्रेसने आजवर प्रत्येक निवडणुकीत दलित समाजाचा वापर करून त्यांना फेकून देण्याचा, दलितांना सतत फसवण्याचा आणि आंबेडकरी चळवळीचा तेजोभंग करण्याचाच गोरखधंदा सातत्याने केला, हे कसे विसरता येईल? काँग्रेसने दलितांबरोबर बेईमानी, दगाबाजी करताना सरंजामी-सामंती कुटुंबशाहीचे नात्यागोत्याचे राजकारण करून दलितांना सत्तेत सहभागी करून न घेता त्यांच्यावर वरपासून खालपर्यंत राज्य केले. काँग्रेसचे हे पाप दलित समाज कधीही विसरणार नाही, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

ना. मुनगंटीवार यांचे विचार ऐकण्यासाठी घुग्गुस परिसरातील कार्यकर्त्यांनी जाहीर सभेला रेकॉर्ड ब्रेक गर्दी केली. यावेळी दोनशे मुस्लिम कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. या सर्वांच्या गळ्यात भाजपचा दुपट्टा घालून ना. मुनगंटीवार यांनी स्वागत करून पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.

## आंबेडकर जयंती निमित्याने मदतीचा हात; प्रमोद नागापुरे यांचा उपक्रम




**वरोरा । प्रतिनिधी**

वरोरा तालुक्यातील परसोडा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या निमित्याने सामाजिक कार्यकर्ते प्रमोद नागापुरे यांनी मदतीचा हात पुढे केला.

परसोडा या गावात आंबेडकर जयंती असल्याने प्रमोद नागापुरे यांनी भेट दिली. आपले सामाजिक दायित्व असल्याने बौध्द समाजाला एक खाद्य तेलाचा टिन भेट देण्यात आला. तसेच सायंकाळी भोजनाचा कार्यक्रम असल्याने पाण्याची व्यवस्था लावण्यात आली. यामुळे प्रमोद नागापुरे यांचे बौध्द समाज परसोडा यांनी आभार व्यक्त केले. यावेळी समाजाचे अध्यक्ष ब्राम्हदास मेश्राम, प्रवीण लभाने, कैलास तामगाडगे उपस्थित होते.

## खेडुले कुणबी समाज मंडळाचा ना.मुनगंटीवार यांना जाहीर पाठिंबा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर लोकसभा निवडणुकीमध्ये खेडुले कुणबी समाज मंडळ चंद्रपूर जिल्हा यांनी चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदार संघातील भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई (आठवले गट), पिरीपा (कवाडे गट), रासप मित्रपक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार ना. सुधीर मुनगंटीवार यांना जाहीर पाठिंबा दिला आहे.

चंद्रपूर लोकसभा क्षेत्राचा कायापालट व्हावा, मतदार क्षेत्रातील प्रश्न मार्गी लागावे यासाठी संपूर्ण महाराष्ट्र राज्यातून सामाजिक व राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या विविध संघटना स्वयंस्फूर्तीने ना. मुनगंटीवार यांना जाहीर पाठिंबा आणि समर्थन देत आहेत. सर्वसामावेशक नेता म्हणून सुधीरभाऊंची ओळख आहे. त्यांना एकदा भेटले की काम होतेच, असा विश्वास निर्माण झाल्यामुळे हा लोकनेता या क्षेत्रातून विक्रमी मतांनी विजयी व्हावा, असा संकल्प देखील समाजाद्वारे करण्यात आला आहे. नुकतेच खेडुले कुणबी समाजाच्या शिष्टमंडळाने ना. सुधीर मुनगंटीवार यांची भेट घेऊन चर्चा केली. तसेच त्यांना सर्वाधिक मतांनी निवडून देण्यासाठी दिवसरात्र परिश्रम घेऊ, असा विश्वास व्यक्त केला. कुणबीसमाज मंडळ चंद्रपूरचे अध्यक्ष पुरुषोत्तम सहारे, उपाध्यक्ष देवराव माकडे, सचिव गुलाब मातेरे, डॉ. यशवंत सहारे, अशोक शेंडे, विठ्ठल देशमुख, सुधीर नाकाडे, रमेश गद्रे, ड. नितीन तोंडरे, चंद्रकांत शेंडे, बक्षीजी ठाकरे यांच्यासह खेडुले समाज मंडळाचे अनेक पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. लोकसभा निवडणुकीत जाहीर पाठींबा दिल्याबद्दल ना. मुनगंटीवार यांनी खेडुले कुणबी समाजबांधवांचे आभार मानले आहे.



## गिरगांव येथे भिमजयंती जल्लोषात साजरी

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

विश्वरत्न, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त गिरगांव येथे बौद्ध समाज, रमाबाई महीला मंडळ, रिपब्लिकन विद्यार्थी फेडरेशन गिरगांव तर्फे दोन दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

त्यामध्ये दिनांक १४ एप्रिल २०२४ रोजी रविवारला भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले. महामानवास वंदन करून बौद्ध विहारातून या मिरवणुकीची सुरवात करण्यात आली. त्यानंतर महात्मा गांधी चौक त्यानंतर झेड.पी. शाळा, त्यानंतर गोटाळी मोहल्यातून परत येत बसस्टँड चौक येथील पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण कृष्णदास मेश्राम यांच्या शुभहस्ते करण्यात आले. डी.जे. आणि लेझिम च्या तालावर सर्व ग्रामवासी नाचत या मिरवणुकीमध्ये सहभागी झाले होते. शेवटी बुद्ध विहारात सुकेशनी बारसागडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करून या मिरवणुकीची सांगता करण्यात आले. उपस्थित सर्वांना स्वादिष्ट अल्पोहर देण्यात आला. त्यानंतर दिनांक १५ एप्रिल २०२४ रोजी सोमवारला चिमुकल्या शाळकरी मुलांकरिता सामान्य ज्ञान स्पर्धा आयोजित करण्यात आली. भाग घेणाऱ्या सर्व स्पर्धकांना आकर्षित बक्षिसे देऊन संध्याकाळी भोजनाचा कार्यक्रम घेत या दोन दिवसीय कार्यक्रमाचा शांततेत गोड शेवट करण्यात आला.

## येनोली माल येथे भीम जयंती मोठ्या उत्साहात साजरी

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील येनोली माल येथील लिंबूनी बुद्ध विहार येथे बौद्ध बांधवांनी भीम जयंती मोठ्या थाटात साजरी केली.



सकाळी ८ वाजता डॉ बाबासाहेब आंबेडकर तसेच तथागत गौतम बुद्ध व ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून झेंडा वंदन करून भन्ते तिसरी बोधी यांनी धम्म वंदना घेत एक टप्पा पूर्ण केला त्यांनंतर सायंकाळी गावात वाज्यागाज्यात गावात लॅरी काढून डॉल्बी च्या तालावर नाचत नारे म्हणत लिंबूनी बुद्ध विहार येथे सांगता करण्यात आली व लगेच भोजन सुरू करून कार्यक्रम संपन्न करण्यात आला.

## मतदानाच्या ४८ तास आधी प्रचारास बंदी

**गडचिरोली । प्रतिनिधी**

मतदान संपण्याच्या वेळेच्या ४८ तास आधी १२-गडचिरोली-चिमुर लोकसभा मतदार संघामध्ये सायलन्स पिरियड आहे. या लोकसभा क्षेत्रामध्ये ४८ तास आधी प्रचार करता येत नाही. तसेच या मतदार संघातील रहिवासी नसलेली व्यक्ती राजकीय प्रचारासाठी या क्षेत्रात राहू शकत नाही, असे आयोगाचे निर्देश आहेत. यानुसार १२-गडचिरोली-चिमुर लोकसभा मतदार संघातील आमगाव, आरमोरी, गडचिरोली व अहेरी या विधानसभा मतदार संघात १७ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजता तर ब्रम्हपुरी व चिमुर या विधानसभा मतदार संघात सायंकाळी ६ वाजतानंतर प्रचारास बंदी राहील.

मतदान करण्याबाबत जनतेमध्ये जनजागृती करण्यात आली आहे. घरोघरी जाऊन वोटर गाईड देण्यात आले आहे. मतदारांना मतदार वोटर स्लिप उपलब्ध करुन दिल्या आहेत. इपीआयसी व्यतिरिक्त कोणते दस्तऐवज मतदानासाठी वापरता येतील याबाबत वृत्तपत्रांतून जनजागृती करण्यात आली आहे. आदर्श आचार संहितेचे उल्लंघन होणार नाही याची काळजी घेण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यातील मतदानासाठी मतदान केंद्रे आवश्यक सोयी-सुविधांसह सुसज्ज आहेत.जिल्ह्यात लोकसभा निवडणुकीसाठी सर्व तयारी झालेली आहे. मतदारांनी निवडणुकीत मोठ्या प्रमाणात मतदान करण्यासाठी पुढे येण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात येत आहे.

# गोंडवाना विद्यापीठातील जगद्गुरु संत तुकाराम महाराज अध्यासन केंद्राच्या वतीने निबंध स्पर्धा

## विद्यापीठ परीक्षेत्रातील विद्यार्थ्यांना सहभागी होण्याचे आवाहन

**गडचिरोली । प्रतिनिधी**

जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या विचाराचा प्रचार-प्रसार व्हावा यादृष्टीने,गोंडवाना विद्यापीठातील जगद्गुरु संत तुकाराम महाराज अध्यासन केंद्राच्यावतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. या अध्यासन केंद्राच्यावतीने विद्यापीठस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन जगद्गुरु संत तुकाराम महाराज अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. हेमराज निखाडे यांनी केले आहे.

निबंध सादर करण्याची अंतिम तारीख २५ एप्रिल २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत असेल. त्यानंतर प्राप्त झालेले निबंध विचारात घेतले जाणार नाही. याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. तसेच महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना सदर स्पर्धेत सहभागी होण्याकरीता प्रोत्साहित करावे.

हे आहेत निबंधाचे विषय: १.जगद्गुरु संत तुकारामाच्या साहित्यातील सामाजिकता, २. जगद्गुरु संत तुकारामाचे व्यक्तिमत्व: अभंगगाथा, ३. जगद्गुरु संत तुकारामाचे वारकरी संप्रदायात योगदान, ४. जगद्गुरु संत तुकाराम काल, आज आणि उद्या हे निबंधाचे विषय असून विद्यार्थ्यांनी वरीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहावा.

बक्षिसाचे स्वरूप:प्रथम क्रमांक रु. ४ हजार रोख व प्रमाणपत्र, द्वितीय क्रमांक रु. ३ हजार रोख व प्रमाणपत्र, तृतीय क्रमांक रु. २ हजार रोख व प्रमाणपत्र तसेच प्रोत्साहनपर बक्षीस म्हणून तीन निबंधांना तुकारामगाथा व प्रमाणपत्र भेट दिल्या जाईल.



निबंध स्पर्धेचे सर्वसाधारण निकष: निबंधातील आशय संपन्नता, अद्ययावतता, सामाजिक बांधिलकी, वैचारिक मांडणी, तर्कशुद्धता, भाषाशैली व परिणामकारकता तसेच प्रमाणलेखन हे स्पर्धेचे सर्वसाधारण निकष आहेत. संत तुकारामाचे समाज निरीक्षण, चिंतनशीलता याचे प्रतिबिंब असावे, निबंधाच्या शेवटी संदर्भग्रंथ सूची असावी. मुद्देसूदपणा आणि वैज्ञानिक दृष्टिकोन निबंधात अपेक्षित आहे.

गोंडवाना विद्यापीठातंर्गत शिक्षण घेत असलेले पदवी व पदव्युत्तर पदवीचे सर्व विद्यार्थी तसेच चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील सर्व वरिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थी या निबंध स्पर्धेत सहभागी होऊ शकतात.

निबंधाची शब्द मर्यादा ३ हजार शब्दपर्यंत असावी. निबंधाचे माध्यम मराठी असावे. निबंध महाविद्यालयातील प्राचार्याने प्रमाणित केलेला असावा. निबंध सुवाच्च हस्ताक्षरात व सुस्पष्ट भाषेत असावा. निबंधासोबत प्राचार्याने साक्षांकित केलेले एक स्व-परिचय पत्र पाठविणे अनिवार्य आहे. निबंध गोंडवाना विद्यापीठातील जगद्गुरु संत तुकाराम अध्यासन केंद्रात दि. २५ एप्रिल २०२४ पर्यंत पोस्टाने किंवा स्वतः पोहोचवावा. २५ एप्रिल २०२४ नंतर येणारा कोणताही निबंध स्वीकारला जाणार नाही. २५ एप्रिलनंतर सात दिवसाच्या आत स्पर्धेचा निकाल घोषित केला जाईल व बक्षीस वितरण समारंभाचे आयोजन केले जाईल. अधिक माहितीकरिता अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. हेमराज निखाडे (८९२८२५४९८३) यांच्याशी संपर्क साधावा. असे जगद्गुरु संत तुकाराम महाराज अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. हेमराज निखाडे यांनी कळविले आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .